# स्वातंत्र्य, समता आणि प्राथमिक शिक्षण

आपल्या राष्ट्राच्या लिखित राज्यघटनेला, २६ जानेवारीला २००५ ला पंचावन्न वर्षे पूर्ण झाली; म्हणजेच भारतीय जनतेच्या सार्वभौमत्वालाही पंचावन्न वर्षे पूर्ण झाली आहेत. घटनेचा जाहीरनामा, घटनेच्या तिसऱ्या विभागात दिलेले मूलभूत हक्क आणि चवथ्या विभागात दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किती प्रमाणात व्यवहारात उतरली आहेत, याचा अभ्यासपूर्ण शोध आपण घ्यायला हवा. माझा कयास असा आहे, की बहुतेक गोष्टींच्या बाबतीत आपण पंधरा वीस टक्के इतकीही मजल मारली नसावी, तर काही बाबतीत सुचविलेली दिशाही आपण पकडलेली नसावी. पूर्णता तर अजून आपल्या स्वप्नातच आहे. शंका अशीही आहे, एखाद्या बाबतीत आपण अगदी उलटी दिशाच तर पकडली नाही ना?

आपण शिक्षणाबाबत, त्यातही घटनेच्या ४५ व्या कलमात सांगितलेल्या १४ वर्षाच्या आतील मुलांच्या शिक्षणाबाबत, असा शोध घेऊया.

भारतीय राज्यघटनेचा जाहीरनामा फार चांगला आहे. दीर्घकालचे निकोप सामाजिक जीवन कसे असावे, हे सांगणारा तो एक उत्तम नमुना आहे. जगात तो वाखाणला गेला आहे. त्यामध्ये, विचार करण्याचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य अपेक्षिलेले आहे. त्यामध्ये प्रतिष्ठा आणि संधी यांची समानता अपेक्षिलेली आहे. हे स्वातंत्र्य, ही समानता प्रत्येक व्यक्तिला, निदान शिक्षणाच्या बाबतीत तरी, मिळण्याची काय व्यवस्था आहे? स्वातंत्र्य आणि शिक्षण तसेच समानता आणि शिक्षण यांचा संबंध कसा आणि कितपत आहे ?

## विचारस्वातंत्र्य

विचाराचे स्वातंत्र्य हा, खरे तर लोकशाहीचा प्राण आहे. तो व्यवहारात उतरण्यासाठी स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता असणे, असा विचार मांडण्याची मानसिक ताकद येणे आणि तशी परिस्थिती अस्तित्वात असणे याचा गोष्टींची गरज आहे. या तीनही गोष्टी निर्माण करण्यात शिक्षणाचे विशेष कार्य आहे. लहान वयात स्वतंत्र विचारशक्ती विकसिक होईल अशाप्रकारची शिक्षणव्यवस्था व शिक्षणपध्दती, प्राथमिक शाळांतून असावी लागेल. परंतु शाळांचे प्रत्यक्षातील चित्र मात्र गुलामीची जोपासना करणारे आहे. विद्यार्थी हे शिक्षकांचे गुलाम, शिक्षक हे व्यवस्थापनाचे गुलाम, व्यवस्थापन हे शासकीय शिक्षण खात्याचे गुलाम अशी परिस्थिती आहे. मुलांच्या स्वतंत्र आचार -विचार-कृतींना कुठलाही वाव न देणारी पठडीबध्द शिक्षणपध्दती हे आपल्या शिक्षणव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. वर्गव्यवस्था, गणवेश (टाय -बुट) इत्यादी ठराविक वेळांचे ठराविक तास, सक्तीचा अभ्यासक्रम, सततच्या परीक्षा आणि सगळयाला वेढून बसलेले स्पर्धेचे वातावरण यांमुळे मुलांच्या स्वतंत्र विचारशीलतेचा विकास होण्याऐवजी ऱ्हासच होताना दिसतो. या पठडीबध्द शिक्षणाचे लोण तर आता, जिथे औपचारिक शिक्षणच असू नये, अशा शालेयपूर्व शिक्षणातही पसरले आहे. त्यामुळे विचारक्षमता निर्माण होण्यापूर्वी मारण्याचे कार्य चालू आहे.

**अभिव्यक्तिस्वातंत्र्य -**

शाळांतील मुलांना अभिव्यक्तिस्वातंत्र्यही मिळू नये अशी व्यवस्था शाळांशाळांतून आहे. आज्ञापालन, शिस्त अशा बेगडी व भंपक गुणांच्या नावाखाली मोठया प्रमाणावर मुलांच्या स्वतंत्र, अभिव्यक्तिला उत्स्फूर्तता, कलांची उर्मी, स्वच्छंद कल्पकता यांना परीक्षाधारित शिक्षणव्यवस्थेत स्थान नाही; कुठे असेलच तर तेथेही त्याची, 'अभ्यासविषय' असे मानून गळचेपी केली जाते.

**शिक्षकांचे स्वातंत्र -**

जे विद्यार्थ्यांबाबत तेच शिक्षकांबाबत. शिक्षकांना स्वतंत्र मतेच असत नाहीत. असलीच तर ती मांडण्याचे स्वातंत्र्य नाही; आणि स्वातंत्र्य मिळालेच तर आपले विचार ठामपणे मांडण्याचे धैर्यच नाही. शिक्षक हा शिक्षक राहिलेला नसून तो आता 'शासकीय कर्मचारी' झाला आहे. तो व्यावसायिक शिक्षक राहिलेला नसून तो नोकरशाहीचा एक खालच्या टोकाचा घटक झाला आहे. परिणामतः त्याची वृत्ती शिक्षकाची राहिलेली नसून केवळ नोकरशाहीची झालेली आहे. वरून आदेश घेणे आणि ते जमेल तसे खाली पोचवणे यातून साऱ्या शाळाच गुलामनिर्मितीच्या केंद्र झाल्या आहेत.

ज्या शाळांमधून स्वातंत्र्याचा विचार जोपासला जात नाही, ज्या शाळांतून स्वातंत्र्याच्या विचाराला, अभिव्यक्तीला जाणीवपूर्वक सराव दिला जात नाही, अशा शाळा विचारस्वातंत्र्याची क्षमता असलेल्या पिढया कशा घडवू शकतील? गुलाम शिक्षक मुलांना स्वातंत्र्याची अभिव्यक्ती कशी शिकवतील? जोवर शिक्षण हे सरकारच्या हातात आहे तोवर याहून वेगळे ते काय घडणार?

**समतेचा प्रश्न**

घटनेच्या जाहीरनाम्यात उच्चरवाने सांगितलेला प्रतिष्ठा आणि संधीच्या समानतेचा प्रश्न तर याहूनही गंभीर आहे. येथील शिक्षणव्यवस्था समतेच्या दिशेने जाण्याऐवजी विषमता टिकविण्याचा आणि जमेल तर विषमता वाढविण्याचा वसा घेऊन उभी आहे, असा संशय येतो.

घटनेच्या मूलभूत हक्कांच्या प्रकरणात १५ व्या कलमात, समतेच्या हक्काचे विवरण आले आहे. कोणाही व्यक्तीला धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्माचे ठिकाण यावरून भेदभाव केला जाऊ नये असे म्हटले आहे. समतेचा हक्क हा व्यक्तिगत मूलभूत हक्क मानला गेला आहे. परंतु आपल्या देशात खेडयात जन्माला येणे आणि म्हणून खेडयात प्राथमिक शिक्षण घ्यावे लागणे, म्हणजे शिक्षणाच्या किमान सोयींनाही वंचित होणे होय. शहरांतील शिक्षणाच्या तुलनेत खेडयांतील शिक्षणाच्या सोयी सुविधा अत्यल्प आहेत. फार मोठी विषमता शहर आणि खेडी यांमध्ये याबाबतीत आहे. सर्वांसाठी शालान्त परीक्षा एकच आहे, परंतु त्याची तयारी करणारी प्रथमपासूनची शिक्षणाच्या सोयी - सुविधांची उपलब्धता असमान आहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सुविधा खेड यांमध्ये जवळजवळ नाहीतच. अगदी संडास – मुत्रीआणि स्वच्छ - शुध्द पिण्याच्या पाण्याच्या सोयीदेखली नाहीत. हीच विषमता शिक्षकांच्या आणि व्यवस्थापनाच्या स्तरावरही आहे.

शिक्षकांच्या वेतनात समानता आणली, पण शिक्षकांच्या दर्जामधील दरी कशी भरून काढणार? एकूणच खेडयांमधील शिक्षणाचा दर्जा चिंता करावी एवढा कमी आहे.

अलीकडे, म्हणजे १९७६ साली, ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्यावेळी एक तरतूद वाढविण्यात आली. ती तरतूद असे सांगते, की निकोप पध्दतीने आणि स्वतंत्रतेच्या नि आत्मसन्मानाच्या वातावरणात मुलांना आपला विकास साध्य करता यावा, अशा तऱ्हेच्या संधी नि सुविधा त्यांना पुरविण्यात येतील. अर्थात ४१ व्या कलमाने यास काही प्रमाणात छेद दिला आहे. त्यात, सरकारला त्याच्या आर्थिक क्षमतेच्या प्रमाणात पण प्रभावी रीतीने शिक्षणाचा हक्क अमलात आणण्याचीही सोय ठेवली आहे. परंतु १९९२ सालच्या एका खटल्यात मात्र कर्नाटक उच्च न्यायालयाने, यासंदर्भात आपले स्पष्ट आदेश असे नोंदले आहेत सरकारने एकदा का कायद्याने वा शासकीय कृतीने शिक्षणाच्या सोयी पुरवल्याच तर मग समानतेचे तत्त्व डोळयांसमोर ठेवावेच लागेल.

आज खेडयातील किंवा त्यातही वंचितांच्या मुलांच्या शिक्षणबाबत सरकारची भूमिका केवळ किमानतेचा आग्रह धरणारी आहे, समानतेचा नाही. शिक्षणाचा दर्जाच समान नसेल तर पुढील शिक्षणाच्या आणि आर्थिक सामाजिक व्यवहारांच्या क्षेत्रात संधीची समानता कशी काय अवतरणार? सर्व स्तरांवरची विषमता टिकूनच राहणार नाही का? विषमता वाढवण्याचा वसा -

सरकारची पावले तर याहीपुढे पडत आहेत. केवळ विषमता टिकविण्याचा नव्हे, तर विषमता वाढविण्याचा वसा  शासनाने घेतला आहे, असे दिसून येते. मग ते, पहिलीला इंग्रजीविषय लादून आधुनिक उच्चतम संपन्नतेची खोटी स्वप्ने लोकांपुढे ठेवणे असो किंवा पुन्हा परीक्षा सुरू करण्याच्या नावाखाली आनंददायी शिक्षणाचे पर्व संपवणे असो.

सरकार जाणूनबुजून विषमता वाढविण्याचा प्रयत्न कसा करीत आहे याचे उदाहरण ठळकपणे सांगता येईल.एकात्मिक बालविकासाची अंगणवाडी योजना ही केंद्र सरकारीची योजना आहे. त्यात गावोगाव आणि झोपडपट्ट्यांतून माता - बाल संगोपनासाठी अंगणवाडया उघडण्याचा एक मोठा धडक कार्यक्रम चालू आहे. केंद्र सरकारच्या योजनेत अंगणवाडया सुरू करण्याचा कार्यक्रम आहे, तर महाराष्ट्र सरकारने आपल्या अकलेने, जेथे अंगणवाडया उघडल्या जातात तेथे असलेल्या बालवाडया बंद करण्याचा सपाटा लावला आहे. वास्तविक अंगणवाडी ही बालकाची आरोग्याची योजना आहे, शिक्षणाची नाही. परंतु महाराष्ट्रातील बालशिक्षणाची हेळसांड आहे, त्यातही खेडयात अनेक बालकांना बालशिक्षणाची संधीच नाही.

जी काही थोडी फार उपलब्ध आहे तीही सरकार हिरावून घेत आहे. शास्त्रीय बालशिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. शहरांतून आता त्याचा बऱ्यापैकी विस्तार झाला आहे. त्यामुळे शहरी मुलांना त्याचा लाभ मिळतो. अशा शहरी बालवाडया बंद करण्याची ताकद सरकारमध्ये नाही. पण खेडयातील मुलांची पायाभूत शिक्षणाची सोय - सुविधा, शिक्षणाच्या संधी, शिक्षणाचा दर्जा यांबाबत मोठया प्रमाणावर विषमता सरकार निर्माण करीत आहे.

शिक्षणाच्या संदर्भात बऱ्याचदा लोकशाही प्रथांना डावलून, व्यक्तिगत पातळीवर शासनात निर्णय होताना दिसतात. या निर्णयात शैक्षणिक विचार सोडून इतर सर्व दृष्टींनी विचार असतात असे दिसून येते. बालशिक्षण आणि प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात बोलायचे झाले, तर असे म्हणता येईल, की भारतीय

राज्यघटनेच्या विरोधातच सरकारची पावले पडतील. हे सारे सहजपणे घडू शकते कारण या देशात समाज सार्वभौम नसून सरकार सार्वभौम आहे. सरकार मालक आणि समाज गुलाम अशी परिस्थिती आहे.

**संघर्षाचे दशक -**

आपण पुढल्या शतकाचा विचार करणार असू तर आपल्याला शिक्षणाच्या संदर्भात स्वातंत्र्य नि समतेच्या स्वप्नांना  पुन्हा फुलवायला हवे आहे. त्यासाठी पुढले दशक हे संघर्षाचे दशक म्हणून आपण आखले पाहिजे.

संघर्ष करायचा आहे तो शिक्षणाच्या मूलभूत हक्कांसाठी, संघर्ष करायचा आहे, शिक्षणाच्या सोयी सुविधांच्या समानतेसाठी, संघर्ष करायचा आहे शास्त्रीय बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी, संघर्ष उभारायचा आहे तो शिक्षणपध्दतीतील व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठी, संघर्ष, तीव्रतेने करायचा आहे तो सारी शिक्षणव्यवस्थाच सरकारच्या गुलामीतून स्वतंत्र्य करण्यासाठी आपण संकल्प करूया. संघर्षासाठी सामान्यांचे उद्याच्या पाडव्यापासून संघर्षाची गुढी उभारण्याचा आणि वंचितांचे आत्मबल वाढण्याची इच्छा आपण करूया.

❖